**ठळक बातम्या**

- आत्मनिर्भरता आणि **वोकल फॉर लोकल** हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची चीनच्या अध्यक्षांबरोबर चर्चा

- मराठा आरक्षणासाठीचं उपोषण आंदोलन उद्यापासून तीव्र करण्याचा मनोज जरांगे यांचा इशारा

- जरांगे यांचं आंदोलन केवळ राजकीय लाभासाठी असल्याची मंत्री चंद्रकांत पाटील यांची टीका

**आणि**

- प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचं निधन

**<><><><>**

आत्मनिर्भरता आणि **वोकल फॉर लोकल** हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मन की बात या कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात त्यांनी आकाशवाणीद्वारे आज देशवासियांना संबोधित केलं. आगामी सणासुदीच्या दिवसात स्वदेशीचा मंत्र विसरू नका, पेहराव, सजावट, उपाहार या सर्व गोष्टी स्वदेशी असाव्यात, असं आग्रही प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी केलं. तसंच उत्सवाच्या काळात स्वच्छता पाळण्याचा सल्ला दिला.

**यूपीएससी** परीक्षेत अपयश येणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर परीक्षांसाठी तयारी करता यावी यासाठी **प्रतिभासेतू** हे डिजिटल व्यासपीठ तयार केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. या पोर्टलमधे अभियंता, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवू बघणाऱ्या पण अपयश आलेल्या विद्यार्थ्यांची माहितीही आहे. या पोर्टलद्वारे माहिती घेऊन खासगी कंपन्या या विद्यार्थ्यांना नोकरी देणार  आहेत. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

**जम्मू काश्मीर**मधल्या दाल सरोवरात नुकत्याच झालेल्या **खेलो इंडिया जलक्रीडा** महोत्सवाचा प्रधानमंत्र्यांनी आपल्या संबोधनात विशेष उल्लेख केला. या स्पर्धेतले सुवर्णपदक विजेते खेळाडू ओदिशा इथली रश्मिता साहू आणि श्रीनगरमधला मोहसीन अली यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला आणि त्यांचं अभिनंदन केलं. एक भारत – श्रेष्ठ भारत ही भावना देशाच्या एकात्मतेसाठी आवश्यक असून खेळ यात महत्त्वाची भूमिका बजावतात असं प्रधानमंत्री म्हणाले.

देशातल्या **सौरऊर्जा** प्रकल्पांच्या प्रयोगाबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सौरऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांचं जीवनमान बदलत असून त्याला त्याच्या मेहनतीचं फळ कैकपटीने जास्त मिळत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**१५ सप्टेंबरला** साजरा केल्या जाणाऱ्या महान अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीनिमित्त तसंच १७ सप्टेंबरला साजऱ्या केल्या जाणाऱ्या विश्वकर्मा जयंतीच्या मोदी यांनी  सर्वांना शुभेच्छा दिल्या. सोनार, लोहार, सुतार , मूर्तीकार यानी देशाच्या प्रगतीचा पाया घातला आहे, असं ते म्हणाले. १७ सप्टेंबरला देशभरात **हैदराबाद मुक्तीसंग्राम दिवस** साजरा केला जाणार असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. रझाकार आणि निजामाच्या अत्याचाराविरोधात लढलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचं त्यांनी स्मरण केलं तसंच  देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची एक ध्वनिफीत श्रोत्यांना ऐकवली.

**पहिल्या महायुद्धापासून** आतापर्यंतच्या शहीद जवानांची माहिती आणि छायाचित्र जतन करणारे जितेंद्र सिंह राठौड यांचा प्रधानमंत्र्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

मागच्या काही दिवसात देशभरात **अतिवृष्टी** आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या जीवितहानी आणि वित्तहानीबद्दल प्रधानमंत्र्यांनी दुःख व्यक्त केलं. तसंच या काळात एनडीआरएफ, एसडीआरएफ, डॉक्टर आणि मदत करणाऱ्या सर्व नागरिकांचं कौतुक केलं.

**- - -होल्ड बाईट डिजास्टर - -**

**भारतीय संस्कृती**चा प्रभाव परदेशातल्या छोट्या छोट्या शहरातही दिसून येतो असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यानीं महर्षी वाल्मिकी यांच्या मूर्तीची स्थापना करणाऱ्या इटलीमधल्या कँपरोतोंदो या शहराचं उदाहरण दिलं. कॅनडात मिसीसागा इथल्या प्रभू

श्रीरामाच्या ५१ फुटी मूर्तीचा उल्लेखही त्यांनी केला. तसंच रशियामधल्या व्लादिवोस्तोक इथं शाळकरी मुलांनी रामायणातल्या कथांवर आधारित चित्रांचं प्रदर्शन भरवल्याचं सांगत भारतीय संस्कृतीचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**<><><>**

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी स्थानिक गणपती मंडळाला भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम त्यांनी इथं रहिवाशांसोबत ऐकला.

भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांनी आज नांदेड  इथं लोकमान्य टिळक गणेश मंडळाला भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं. तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम ऐकला.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. चीनमधे तियानजिन इथं झालेल्या बैठकीत केलेल्या चर्चेची ध्वनिफीत प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी कजान इथं जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर भारत- चीन संबंधांना सकारात्मक दिशा मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

…. **होल्ड - बाईट- प्रधानमंत्री - - -**

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीसाठी प्रधानमंत्री  चीनच्या दौऱ्यावर आहेत. या बैठकीकरता तियानजिन मधे आलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांबरोबरही ते द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. त्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचा समावेश आहे.

**<><><>**

राज्य सरकारनं अद्याप मागण्या मान्य न केल्यानं उद्यापासून उपोषण तीव्र करण्याची घोषणा  मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज केली. उद्यापासून पाणीदेखील पिणार नसल्याचं त्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर वार्ताहरांना सांगितलं. ओबीसी प्रवर्गात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात जरांगे यांनी सुरु केलेल्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. डॉक्टरांच्या पथकाने आज त्यांची प्रकृती तपासली आणि त्यांच्या रक्तदाब आणि मधुमेह चाचण्या सुरळीत असल्याचा निर्वाळा दिला.

समर्थकांनी शांतपणे आंदोलन करावं, ठरवून दिलेल्या ठिकाणी गाड्या उभ्या करुन उपनगरी रेल्वेने आझाद मैदानावर यावं, असं जरांगे यांनी सांगितलं. आंदोलकांची सोय करण्याच्या नावाखाली कोणीही पैसे मागू नयेत, असा इशाराही त्यांनी दिला. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, जरांगे यांनी केलेल्या मागण्यांसंदर्भात आज संध्याकाळी महाधिवक्त्यांशी चर्चा करणार असल्याची माहिती उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या नावाखाली राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. जरांगेंनी यापूर्वी आंदोलन केल्यानंतर मराठा समाजाला सामाजिक तसंच आर्थिक दृष्ट्या मागास श्रेणीचं आरक्षण देण्यात आलं, मात्र त्यात राजकीय आरक्षण समाविष्ट नसल्यानं जरांगे आंदोलन करत आहेत असं पाटील यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचं आज मुंबई जवळ मीरा रोड इथं राहत्या घरी निधन झालं. त्या ३८ वर्षांच्या होत्या. गेला काही काळ त्या कर्करोगाशी झुंज देत होत्या. मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका आणि मोठ्या पडद्यावरही त्यांनी काम केलं होतं. "अ परफेक्ट मर्डर", "कोण म्हणतं टक्का दिला?", आणि "तिला काही सांगायचंय" या लोकप्रिय नाटकांमधे त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या होत्या. छोट्या पडद्यावरच्या "या सुखांनो या" या मालिकेपासून त्यांनी अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली होती. त्यानंतर "चार दिवस सासूचे", "तू तिथे मी", "तुझेच मी गीत गात आहे" अशा अनेक मालिकांमधे त्यांनी काम केलं. "पवित्र रिश्ता" या हिंदी मालिकेतल्या भूमिकेमुळे त्यांना अधिक प्रसिद्धी मिळाली होती.

मोठ्या पडद्यावर त्यांनी गोविंद निहलानी दिग्दर्शित "ती आणि इतर" या मराठी चित्रपटात काम केलं होतं. प्रिया मराठे यांच्या अकाली निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. आज संध्याकाळी चार वाजता मीरा रोड इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**//<><><><>//**